भारत सरकार
विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# लोक ऋण अधिनियम, १९४४

(१९४४ चा अधिनियम क्रमांक १८)

[२९ मे १९९२ रोजी यथाविद्यमान]

# THE PUBLIC DEBT ACT, 1944

**(Act No. 18 of 1944)**

[As in Force on 29th May 1992]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले

१९९४

[किंमत : रुपये २.७०]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २९ मे १९९२ रोजी यथाविद्यमान असलेला लोक ऋण अधिनियम, १९४४ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ३, अंक ३ दिनांक २ जुलै १९९२ यात पृष्ठ १५३ ते १६२ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक : २ जुलै, १९९२.

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Public Debt Act, 1944 as on the 29th May 1992 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 3, Vol. 3, dated 2nd July 1992 on pages 153 to 162.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi:
Date : 2nd July 1992.

K. L. MOHANPURIA,
Secretary to the Government of India.

एच ४३६१–१

# लोक ऋण अधिनियम, १९४४

## कलमांचा क्रम

कलमे


१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१क. ह्या अधिनियम लागू होणाऱ्या प्रतिभूती.

२. व्याख्या.

३. शासकीय प्रतिभूतींचे हस्तांतरण

४. शासकीय प्रतिभूतींचा हस्तांतरक त्यांच्या रकमांसाठी दायी नसणे.

५. सार्वजनिक पदांच्या धारकांनी शासकीय प्रतिभूती धारण करणे.

६. न्यासाबाबतची नोटीस स्वीकारार्ह नसणे.

७. मरण पावलेल्या एकमेव धारकाच्या शासकीय प्रतिभूतीवरील ज्यांचा हक्क बँकेला मान्य करता येईल त्या व्यक्ती.

८. संयुक्त धारकाच्या किंवा पृथक प्रदेयीच्या उत्तरजीवींचा अधिकार.

९. पाच हजार रुपयांपेक्षा अधिक दर्शनी मूल्य नसलेल्या शासकीय प्रतिभूतींच्या धारकाच्या मृत्यूनंतरची संक्षिप्त कार्यपद्धती.

९क. कलमे ९ ख, ९ ग, इत्यादींची प्रयुक्ती.

९ख. शासकीय प्रतिभूतींच्या धारकांकडून नामनिर्देशन.

९ग. धारकांच्या मृत्यूनंतर प्रदान.

१०. अज्ञान किंवा भ्रमिष्ट व्यक्तींच्या मालकीच्या, पाच हजार रुपयांपेक्षा अधिक दर्शनी मूल्य नसलेल्या शासकीय प्रतिभूती.

११. रूपांतरण, एकत्रीकरण, पोट विभागणी किंवा नवीकरण केल्यानंतर प्रतिभूतींच्या दुसऱ्या प्रती आणि नवीन प्रतिभूती देणे.

१२. विवादग्रस्त प्रकरणी शासकीय प्रतिभूतीवरील हक्काबाबत बँकेकडून संक्षिप्त निर्णय होणे.

१३. शासकीय प्रतिभूतींच्या संबंधात लागू असलेला कायदा.

१४. पुरावा अभिलिखित करणे.

१५. प्रदाने व हस्तांतरणांची नोंदणी विहित करण्याबाबतचा आदेश देण्यात येईपर्यंत पुढे ढकलणे.

१६. बँकेची बंधपत्रे करून देण्यास फर्मावण्याची शक्ती.

१७. नोटिसा शासकीय राजपत्रात प्रकाशित करणे.

१८. निहित करण्याबाबतच्या आदेशाची व्याप्ती.

१९. बँकेने दिलेल्या आदेशांचा वैध परिणाम.

२०. न्यायालयाच्या आदेशावरून कार्यवाहीस स्थगिती.

२१. निहित करण्याबाबतची कार्यवाही बँकेकडून रद्द केली जाणे.

२२. शासकीय प्रतिभूतींवरील व्याजाच्या संबंधातील विमुक्ती.

२३. दर्शनी बंधपत्रांच्या संबंधातील विमुक्ती.

२४. शासनाच्या व्याजाच्या संबंधातील दायित्वाची मुदतमर्यादा.

२५. दस्तऐवजांचे निरीक्षण.

२६. बँक आणि तिचे अधिकारी हे लोक अधिकारी असल्याचे मानणे.

२७. शास्ती.

२८. नियम करण्याची शक्ती.

२९. विवक्षित कायदे शासकीय प्रतिभूतींना लागू न होणे.

३०. दिनांक १ एप्रिल १९५१ पूर्वी 'भाग ख' राज्यांमध्ये अंमलात नसतील अशा कायद्यांच्या संदर्भांचा अर्थ लावणे.

३१. जम्मू व काश्मिरमध्ये अंमलात नसतील अशा कायद्यांच्या संदर्भांचा अर्थ लावणे.

# लोक ऋण अधिनियम, १९४४

(सन १९४४ चा अधिनियम क्रमांक १८)[१]

(२९ मे १९९२ रोजी यथाविद्यमान) [२२ नोव्हेंबर, १९४४]

[२]* * * शासकीय प्रतिभूतींसंबंधीचा व भारतीय रिझर्व्ह बँकेकडून करण्यात येणाऱ्या [३][शासनाच्या] लोक ऋणाच्या व्यवस्थापनासंबंधीचा कायदा एकत्रित व विशोधित करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** [२]* * * शासकीय प्रतिभूतींसंबंधीचा व भारतीय रिझर्व बँकेकडून करण्यात येणाऱ्या, [३][शासनाच्या] लोक ऋणाच्या व्यवस्थापनासंबंधीचा कायदा एकत्रित व विशोधित करणे समयोचित आहे ;

**त्याअर्थी,** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, "लोक ऋण [४]* * * अधिनियम, १९४४" असे म्हणता येईल.

[५]* * * *

(३) केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या संबंधात नियत करील अशा दिनांकास[६] तो अंमलात येईल.

**हा अधिनियम लागू होणाऱ्या प्रतिभूती.**

[७][१क. केंद्र शासनाने किंवा [८]* * * राज्य शासनाने निर्माण केलेल्या व निर्गमित केलेल्या शासकीय प्रतिभूतींना हा अधिनियम लागू आहे, मग अशा प्रतिभूती या अधिनियमाच्या प्रारंभाच्या पूर्वी काढलेल्या असोत वा नंतर काढलेल्या असोत.]

**व्याख्या.**

२. या अधिनियमामध्ये विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसेल तर,—

(१) "बँक" याचा अर्थ, भारतीय रिझर्व्ह बँक असा आहे.

[९][(१क) कोणत्याही शासकीय प्रतिभूतीच्या संबंधात "शासन" याचा अर्थ, ती प्रतिभूती निर्गमित करणारे केंद्र किंवा राज्य शासन, असा आहे;]

(२) "शासकीय प्रतिभूती" याचा अर्थ,—

(क) एखादे सरकारी कर्ज उभारण्याच्या प्रयोजनार्थ—

[१०][शासनाने] निर्माण केलेली व निर्गमित केलेली आणि पुढीलपैकी कोणत्याही एका रूपातील एखादी प्रतिभूती असा आहे; ती रूपे अशी :—

(एक) बँकेच्या पुस्तकांत नोंदणी करून हस्तांतरणीय असलेला रोखा ; किंवा

(दोन) दर्शनी देय वचनचिठ्ठी ; किंवा

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **भारताचे राजपत्र**, १९४८, भाग पाच, पृष्ठ १६२ पहा; आणि निवड समितीच्या अहवालासाठी, **भारताचे राजपत्र**, १९४४, भाग पाच, पृष्ठ ८५ पहा.

१९६२ चा विनियम १२ याचे कलम ३ व अनुसूची यांद्वारे हा अधिनियम, गोवा, दमण आणि दीव वर १९६३ चा विनियम ६, यांचे कलम २ व अनुसूची एक यांद्वारे दादरा आणि नगरहवेलीवर आणि १९६३ चा विनियम ७ याचे कलम ३ व अनुसूची एक यांद्वारे पाँडीचेरीवर विस्तारित करण्यात आलेला आहे.

२. १९४९ चा अधिनियम ६ च्या कलम २ द्वारे "केंद्र शासनाने काढलेल्या" हा मजकूर वगळण्यात आला. (१ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून).

३. १९५६ चा अधिनियम ५७, कलम २ द्वारे "संघ आणि 'भाग क' राज्य यांच्या" या मजकुराऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला. (१५ ऑक्टोबर, १९५६ रोजी व तेव्हापासून).

४. १९४९ चा अधिनियम ६ याच्या कलम ३ द्वारे "[केंद्र शासन]" हा मजकूर वगळण्यात आला (१ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून).

५. १९५६ चा अधिनियम ५७ च्या कलम ३ द्वारे पोटकलम (२) वगळण्यात आले.

६. १ मे, १९४६, **भारताचे राजपत्र**, १९४६, भाग एक, पृष्ठ ५७५ पहा.

७. १९५६ चा अधिनियम ५७ याच्या कलम ४ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले. (१५ ऑक्टोबर, १९५६ रोजी व तेव्हापासून).

८. १९७२ चा अधिनियम ४४ याच्या कलम २ द्वारे "जम्मू व काश्मीरच्या शासनाव्यतिरिक्त अन्य" हा मजकूर वगळण्यात आला. (१ सप्टेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

९. १९४९ चा अधिनियम ६ च्या कलम ४ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले. (१ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून).

१०. १९५६ चा अधिनियम ५७ याच्या कलम ५ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला. (१५ ऑक्टोबर, १९५६ रोजी व तेव्हापासून).

(तीन) धारकाला देय असलेले वर्षानी संघपत्र ; किंवा

(चार) या संबंधात विहित केलेले प्रपत्र ;

(ख) विहित करण्यात येईल अशा प्रपत्रात आणि या अधिनियमाच्या विहित करण्यात येतील अशा प्रयोजनार्थ [१][शासनाने] निर्माण केलेली व निर्गमित केलेली इतर कोणतीही प्रतिभूती, असा आहे ;

(३) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(४) "वचनचिठ्ठी" या संज्ञेमध्ये राजकोष पत्राचा समावेश आहे.

**शासकीय प्रतिभूतींचे हस्तांतरण.** ३. (१) [२][एखादी शासकीय प्रतिभूती ज्या वर्गाची असेल त्या वर्गाच्या प्रतिभूतींमध्ये हस्तांतरण करण्यासाठी विहित केलेल्या रीतीनेच केवळ त्या शासकीय प्रतिभूतीचे हस्तांतरण कलम ५ च्या उपबंधाच्या अधीनतेने करण्यात येईल आणि शासकीय प्रतिभूतीचे हस्तांतरण—

(एक) केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या प्रतिभूतींच्या बाबतीत, ३० एप्रिल, १९४६ नंतर केलेले असेल ;

(दोन) 'भाग क' राज्याच्या शासनाने निर्गमित केलेल्या प्रतिभूतींच्या बाबतीत, ३१ मार्च, १९४९ नंतर केलेले असेल ;

(तीन) जम्मू आणि काश्मीर व्यतिरिक्त इतर 'भाग ख' राज्याच्या शासनाने निर्गमित केलेल्या प्रतिभूतींच्या बाबतीत, १४ ऑक्टोबर, १९५६ नंतर केलेले असेल, [३]* * *

(चार) जम्मू आणि काश्मीर व्यतिरिक्त इतर कोणत्याही राज्याच्या शासनाने १ नोव्हेंबर, १९५६ रोजी किंवा त्यानंतर निर्गमित केलेल्या प्रतिभूतीच्या बाबतीत, त्या तारखेस किंवा त्यानंतर केलेले असेल, [४][आणि]

[५][(पाच) जम्मू व काश्मीर राज्याच्या शासनाने १ सप्टेंबर, १९७२ रोजी किंवा त्यानंतर निर्गमित केलेल्या प्रतिभूतींच्या बाबतीत, त्या तारखेस किंवा त्यानंतर केलेले असेल,]

ते कोणतेही हस्तांतरण जर—]

(क) त्या प्रतिभूतीबाबतचा संपूर्ण हक्क अभिहस्तांतरित करणे अभिप्रेत नसेल, तर, किंवा

(ख) त्याचे स्वरूप ती प्रतिभूती ज्या रीतीने धारण करण्यात यावी असे [६][शासनाने] व्यक्त केलेले असेल त्या रीतीवर परिणाम होईल असे असेल तर, विधिग्राह्य असणार नाही.

(२) या कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा परिणाम रिझर्व्ह बँकेने या अधिनियमान्वये, दिलेल्या कोणत्याही आदेशावर किंवा न्यायालयाने रिझर्व्ह बँकेवर काढलेल्या कोणत्याही आदेशावर होणार नाही.

**शासकीय प्रतिभूतीचा हस्तांतरक त्यांच्या रकमांसाठी दायी नसणे.** ४. परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ (१८८१ चा २६) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी एखाद्या व्यक्तीने केवळ शासकीय प्रतिभूती हस्तांतरित केली एवढ्याच कारणावरुन ती व्यक्ती, त्या प्रतिभूतींतील, मुद्दल किंवा व्याज म्हणून देय असलेला कोणताही पैसा देण्यास दायी असणार नाही.

**सार्वजनिक पदांच्या धारकांनी शासकीय प्रतिभूती धारण करणे.** ५. (१) [६][शासन], ज्या सार्वजनिक पदाला हे पोटकलम लागू आहे असे शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे घोषित करील त्या कोणत्याही सार्वजनिक पदाच्या बाबतीत, रोख्याच्या किंवा एखाद्या वचन चिठ्ठीच्या रुपातील शासकीय प्रतिभूती त्या पदाच्या नावावर धारण केली जाऊ शकेल.

---

१. १९५६ चा अधिनियम ५७ याच्या कलम ५ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला. (१५ ऑक्टोबर, १९५९ रोजी व तेव्हापासून.)

२. विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६ याद्वारे प्रारंभीच्या परिच्छेदाऐवजी हा परिच्छेद दाखल करण्यात आला.

३. १९७२ चा अधिनियम ४४ याच्या कलम ३ द्वारे "आणि" हा शब्द वगळण्यात आला. (१ सप्टेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून.)

४. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे या शब्दाची भर घालण्यात आली. (१ सप्टेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून.)

५. १९७२ चा अधिनियम ४४, कलम ३ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला. (१ सप्टेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून.)

६. १९४९ चा अधिनियम ६ याच्या कलम ६ द्वारे "केंद्र शासनाने" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला. (१ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून.)

(२) शासकीय प्रतिभूती अशा रीतीने धारण करण्यात आली असेल त्यावेळी, त्या पदाच्या धारकाकडून उत्तरवर्ती धारक ज्या तारखेस त्या पदाचा प्रभार घेईल त्या तारखेस व त्या तारखेपासून ती शासकीय प्रतिभूती अशा प्रत्येक धारकाकडून उत्तरवर्ती धारकाकडे कोणत्याही किंवा पुढील पृष्ठांकनाशिवाय किंवा हस्तांतरण विलेखाशिवाय हस्तांतरीत झाली असल्याचे मानण्यात येईल.

(३) ज्या वेळी त्या पदाचा धारक अशा रीतीने धारण केलेली शासकीय प्रतिभूती, आपला पदीय उत्तराधिकारी नसेल अशा एखाद्या पक्षकाराकडे हस्तांतरीत करील तेव्हा, असे हस्तांतरण कलम ३ मध्ये घालून दिलेल्या रीतीने व घालून दिलेल्या शर्तीच्या अधीनतेने, त्या पदधारकाच्या सहीने व पदाच्या नावाने करण्यात येईल.

(४) हे कलम जसे एकच धारक असणाऱ्या पदास लागू आहे त्याचप्रमाणे ते, दोन किंवा अधिक संयुक्त धारक असणाऱ्या पदांसदेखील लागू आहे.

**न्यासाबाबतची नोटीस स्वीकारार्ह नसणे.**

६. (१) कोणत्याही शासकीय प्रतिभूतीच्या संबंधातील, कोणत्याही न्यासाबाबतची कोणतीही नोटीस [1][शासनाला] स्वीकारार्ह असणार नाही, किंवा अशी कोणतीही नोटीस व्यक्तपणे देण्यात आलेली असली तरी ती, [1][शासनावर] बंधनकारक असणार नाही, किंवा कोणत्याही शासकीय प्रतिभूतीच्या संबंधात, [1][शासन] हे न्यासी असल्याचे समजण्यात येणार नाही.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधांना बाध न आणता, बँकेला अनुग्रह म्हणून आणि बँकेवर किंवा [1][शासनावर] कोणतेही दायित्व न घेता, रोख्यावरील व्याजाचे किंवा त्याच्या परिणत मूल्याचे प्रदान अथवा त्या रोख्याचे हस्तांतरण यासंबंधात किंवा त्या रोख्याबाबत अशाच इतर बाबतीत रोख्याच्या धारकाकडून मिळाले असतील असे बँकेला योग्य वाटतील ते निदेश आपल्या पुस्तकांमध्ये अभिलिखित करता येतील.

**मरण पावलेल्या एकमेव धारकाच्या शासकीय प्रतिभूतीवरील ज्यांचा हक्क बँकेला मान्य करता येईल त्या व्यक्ती.**

७. कलम ९ च्या उपबंधाच्या अधीनतेने, एखाद्या शासकीय प्रतिभूतीच्या एकमेव मृत धारकाचे मृत्युपत्र व्यवस्थापक किंवा प्रशासक आणि भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ (१९२५ चा ३९) याच्या भाग दहा अन्वये देण्यात आलेल्या उत्तराधिकार प्रमाणपत्राचा धारक याच केवळ अशा व्यक्ती असतील की, ज्यांचा त्या शासकीय प्रतिभूतीवर कोणताही हक्क असल्याचे बँकेला मान्य करता येईल:

परंतु एखादी शासकीय प्रतिभूती मिताक्षर कायद्याने नियंत्रित असणाऱ्या एखाद्या हिंदू अविभक्त कुटुंबातील एखाद्या मृत सदस्याच्या नावावर असल्याचे बँकेला दिसून येईल आणि त्या कुटुंबाच्या व्यवस्थापकाने किंवा एकमेव उत्तरजीवी पुरुष सदस्याने आपला हक्क मान्य केला जावा म्हणून अर्ज केला असेल आणि मृत व्यक्ती ही मिताक्षरी कायद्याने नियंत्रित असणाऱ्या हिंदू अविभक्त कुटुंबातील होती, ती शासकीय प्रतिभूती त्या कुटुंबाच्या संयुक्त संपत्तीचा भाग होती, आणि अर्जदार हा, त्या कुटुंबाचा व्यवस्थापक किंवा एकमेव उत्तरजीवी पुरुष सदस्य आहे अशा आशयाच्या विहित करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्याने सही केलेल्या आणि अशी चौकशी केल्यानंतर दिलेल्या प्रमाणपत्राद्वारे अशा अर्जास पुष्टी मिळालेली असेल तेव्हा, अशा व्यवस्थापक किंवा एकमेव उत्तरजीवी पुरुष सदस्याचा, त्या शासकीय प्रतिभूतीवरील हक्क मान्य करण्यास बँकेला या कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे आडकाठी होणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, "मिताक्षर कायद्याने नियंत्रित असणारे हिंदू अविभक्त कुटुंब" या शब्दप्रयोगामध्ये मलबार तरवडाचा समावेश असल्याचे मानण्यात येईल.

**संयुक्त धारकाच्या किंवा पृथक प्रदेयीच्या उत्तरजीवींचा अधिकार.**

८. भारतीय संविदा अधिनियम, १८७२ (१८७२ चा ९) याच्या कलम ४५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) ज्यावेळी एखादी शासकीय प्रतिभूती दोन किंवा अधिक व्यक्तींनी संयुक्तपणे धारण केलेली असेल आणि त्यांच्यातील एक किंवा कोणीही मरण पावेल त्यावेळी, त्या प्रतिभूतीवरील हक्क त्या व्यक्तींपैकी उत्तरजीवी व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या ठायी निहित होईल, आणि

(ख) ज्यावेळी एखादी शासकीय प्रतिभूती दोन किंवा अधिक व्यक्तींना पृथकपणे प्रदेय असेल आणि त्यांच्यातील एक किंवा कोणीही मरण पावेल त्यावेळी ती प्रतिभूती त्या व्यक्तींपैकी उत्तरजीवी व्यक्तीला किंवा व्यक्तींना अथवा मृताच्या प्रतिनिधीला किंवा त्यांच्यापैकी कोणालाही प्रदेय असेल:

परंतु, हे कलम लागू असलेल्या कोणत्याही प्रतिभूतीअन्वये किंवा तिच्या संबंधात मृत व्यक्तीच्या कोणत्याही प्रतिनिधीचा उत्तरजीवी व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या विरुद्ध कोणताही दावा असल्यास, त्या दाव्यावर या कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही.

---

१. १९४९ चा अधिनियम ६ याच्या कलम ६ द्वारे "केंद्र शासन" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला (१ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून).

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, [1][कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याअन्वये] किंवा सहकारी संस्था अधिनियम, १९१२ (१९१२ चा २) याअन्वये किंवा व्यक्तींच्या अधिसंघाच्या निगमनांशी संबंधित असलेल्या [2][भारतामध्ये किंवा भारताबाहेर] त्या त्या काळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमितीन्वये [3][निगमित केलेला किंवा निगमित केल्याचे समजण्यात आलेला निकाय] विसर्जित होईल तेव्हा तो मरण पावला असल्याचे मानण्यात येईल.

पाच हजार रुपयांपेक्षा अधिक दर्शनी मूल्य नसलेल्या शासकीय प्रतिभूतींच्या धारकाच्या मृत्यूनंतरची संक्षिप्त कार्यपद्धती.

९. एकूण पाच हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या दर्शनी मूल्याच्या शासकीय प्रतिभूतीची किंवा प्रतिभूतींची धारक असलेल्या एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर सहा महिन्यांच्या आत तिच्या मृत्युपत्राचे संप्रमाण किंवा तिच्या संपदेची प्रशासन पत्रे किंवा भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ (१९२५ चा ३९) याच्या भाग दहा अन्वये देण्यात आलेले उत्तराधिकार प्रमाणपत्र, बँकेकडे सादर करण्यात आलेले नाही किंवा यांपैकी कोणतीही एक गोष्ट मिळवण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे याबाबत रिझर्व्ह बँकेचे समाधान होईल असा पुरावा देण्यात आला नाही तर, कलम ७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मृताच्या प्रतिभूतीस किंवा प्रतिभूतींस अथवा मृताच्या संपदेचे प्रशासन करण्यास कोणती व्यक्ती हक्कदार आहे ते बँकेला ठरवता येईल आणि तिला अशा रीतीने ठरवलेल्या व्यक्तींकडे ती किंवा त्या प्रतिभूती निहित करण्याचा आदेश देता येईल.

कलमे ९ ख, ९ ग, इत्यादींची प्रयुक्ती.

[4][९क. कलम १क मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलमे ९ख आणि ९ग यांचे उपबंध आणि कलमे ९ख आणि ९ग यांमध्ये निर्देशिलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात नियम करण्याची शक्ती या गोष्टी केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा वर्गातील, त्या शासनाने लोक ऋण (विशोधन) अधिनियम, १९५९ (१९५९ चा ४४) याच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर निर्माण केलेल्या व विक्रीस काढलेल्या प्रतिभूतींनाच लागू होतील आणि अशा वर्गातील प्रतिभूतींच्या संबंधात, कलमे ७ आणि ९ यांचे उपबंध हे, कलमे ९ख आणि ९ग यांमध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या अधीनतेने परिणामक होतील.

शासकीय प्रतिभूतींच्या धारकांकडून नामनिर्देशन.

९ख. (१) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये किंवा एखाद्या शासकीय प्रतिभूतीच्या संबंधातील कोणत्याही विल्हेवाटीत—मग ती मृत्युपत्रीय असो वा अन्यथा असो—काहीही अंतर्भूत असले तरी, ज्यावेळी विहित रीतीने केलेले एखादे नामनिर्देशन हे, त्या प्रतिभूतीच्या धारकाच्या मृत्यूनंतर त्या प्रतिभूतीवर त्या त्या काळी देय असलेल्या रकमेचे प्रदान स्वीकारण्याचा अधिकार कोणत्याही व्यक्तीला देत असल्याचे अभिप्रेत असेल त्यावेळी, नामनिर्देशिती, त्या प्रतिभूतीच्या धारकाच्या मृत्यूनंतर अन्य सर्व व्यक्तींना वगळून त्या प्रतिभूतीस आणि त्यांवरील प्रदानास हक्कदार होईल, मात्र नामनिर्देशनामध्ये विहित रीतीने बदल करण्यात आला असेल किंवा ते रद्द करण्यात आले असेल तर अलाहिदा.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेले कोणतेही नामनिर्देशन करणाऱ्या प्रतिभूती धारकाचा नामनिर्देशिती पूर्वमृत झाला किंवा जेथे दोन किंवा अधिक नामनिर्देशिती असतील तेथ ते सर्व नामनिर्देशिती त्या प्रतिभूती धारकाच्या पूर्वमृत झाले तर ते नामनिर्देशन शून्य होईल.

(३) शासकीय प्रतिभूतीच्या विहित रीतीने करण्यात आलेल्या हस्तांतरणामुळे अगोदर केलेले नामनिर्देशन आपोआप रद्द होईल :

परंतु, जेथे एखादी शासकीय प्रतिभूती कोणत्याही व्यक्तीद्वारे किंवा तिच्यावतीने कोणत्याही प्रयोजनार्थ, तारण म्हणून किंवा जामिनीच्या रूपाने धारण करण्यात आली असेल तेथे अशा धारण करण्याच्या परिणामी नामनिर्देशन रद्द होणार नाही, परंतु, नामनिर्देशितीचा अधिकार ती प्रतिभूती अशा रीतीने धारण करणाऱ्या व्यक्तीच्या अधिकाराच्या अधीन असेल.

(४) जेथे नामनिर्देशिती अज्ञान असेल तिथे नामनिर्देशितीच्या अज्ञान दशेमध्ये प्रतिभूती धारकाचा मृत्यू झाल्यास त्या प्रतिभूतीवर त्या त्या काळी देय असलेली रक्कम स्वीकारण्यास प्रतिभूती धारकाने कोणत्याही व्यक्तीला विहित रीतीने नियुक्त करणे कायदेशीर ठरेल आणि जेथे अशी कोणतीही नियुक्ती करण्यात आलेली असेल तेथ, धारकाच्या मृत्यूनंतर आणि नामनिर्देशितीच्या अज्ञान दशेमध्ये ती शासकीय प्रतिभूती अज्ञान व्यक्तीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या त्या व्यक्तीकडे निहित झाल्याचे मानण्यात येईल.

धारकांच्या मृत्यूनंतर प्रदान.

९ग. (१) एखादी व्यक्ती मरण पावेल आणि तिच्या मृत्यूच्या वेळी ती शासकीय प्रतिभूतीची धारक असेल व तिच्या मृत्यूच्या वेळी कोणत्याही व्यक्तीच्या नावाने केलेले नामनिर्देशन अंमलात असेल तर, त्या प्रतिभूतीवर त्या त्या काळी देय असलेली रक्कम नामनिर्देशितीला देण्यात येईल.

---

१. १९५६ चा अधिनियम ५७ च्या कलम ७ अन्वये "भारतीय कंपनी अधिनियम, १९१३ (१९१३ चा ७)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१५ ऑक्टोबर, १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतामध्ये किंवा प्रांताबाहेर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. १९५६ चा अधिनियम ५७ च्या कलम ७ द्वारे "निगमित केलेला निकाय" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१५ ऑक्टोबर, १९५६ रोजी व तेव्हापासून).

४. १९५९ चा अधिनियम ४४, कलम २ द्वारे ९क, ९ख आणि ९ग ही कलमे समाविष्ट करण्यात आली (१ ऑगस्ट, १९६० रोजी व तेव्हापासून).

(२) जेथे नामनिर्देशिती एक अज्ञान व्यक्ती असेल तेथे, शासकीय प्रतिभूतीवर त्या त्या काळी देय असलेली रक्कम,—

(क) ती रक्कम घेण्यास कलम ९ख च्या पोटकलम (४) अन्वये एखादी व्यक्ती नियुक्त करण्यात आलेली असेल अशा कोणत्याही प्रकरणी, त्या व्यक्तीला ; आणि

(ख) अशी कोणतीही व्यक्ती नसेल त्या बाबतीत, त्या अज्ञान व्यक्तीच्या पालकाला त्या अज्ञान व्यक्तीच्या उपयोगासाठी देण्यात येईल.

(३) जेथे एखाद्या शासकीय प्रतिभूतीवर त्या त्या काळी देय असलेली रक्कम, दोन किंवा अधिक नामनिर्देशितींना प्रदेय असेल आणि त्यांच्यापैकी एक किंवा कोणतीही व्यक्ती मृत असेल तेथे त्या प्रतिभूतीवरील हक्क त्या नामनिर्देशितींपैकी उत्तरजीवीकडे किंवा उत्तरजीवींकडे निहित होईल आणि प्रतिभूतीवरी त्या त्या काळी देय असलेली रक्कम त्याप्रमाणे प्रदान करण्यात येईल.

(४) या कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही व्यक्तीला, एखादी शासकीय प्रतिभूती परिपक्व होण्यापूर्वी किंवा त्या प्रतिभूतीच्या अटींनुसार असेल त्या व्यतिरिक्त अन्य प्रकारे, त्या प्रतिभूतीवरील देय रकमेचे प्रदान स्वीकारणे भाग पडते असे मानण्यात येणार नाही.

(५) एखाद्या शासकीय प्रतिभूतीवर त्या त्या काळी देय असलेल्या रकमेचे या कलमाच्या उपबंधानुसार केलेले कोणतेही प्रदान त्या प्रतिभूतीच्या संबंधातील संपूर्ण विमुक्ती असेल :

परंतु, या कलमान्वये जिला कोणतेही प्रदान करण्यात आले आहे त्या व्यक्तीविरुद्ध कोणत्याही व्यक्तीचा कोणताही अधिकार किंवा दावा असेल तर, त्यावर या कलमामध्ये किंवा कलम ९ख मध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही.]

**अज्ञान किंवा भ्रमिष्ट व्यक्तीच्या मालकीच्या, पाच हजार रुपयांपेक्षा अधिक दर्शनी मूल्य नसलेल्या शासकीय प्रतिभूती.**

१०. ज्यावेळी शासकीय प्रतिभूती अज्ञान व्यक्तीच्या किंवा जी भ्रमिष्ट असून स्वतःचे व्यवहार पाहण्यास असमर्थ आहे अशा एखाद्या व्यक्तीच्या मालकीची असेल किंवा असतील व त्या प्रतिभूतीचे किंवा प्रतिभूतींचे एकूण दर्शनी मूल्य पाच हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल त्या वेळी, बँक तिच्या मते जी व्यक्ती त्या अज्ञान किंवा भ्रमिष्ट व्यक्तीचे प्रतिनिधित्व करत असेल त्या व्यक्तीकडे अशी किंवा अशा प्रतिभूती निहित करण्यासाठी तिला (बँकेला) योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल.

**रूपांतरण, एकत्रीकरण, पोट विभागणी किंवा नवीकरण केल्यानंतर प्रतिभूतींच्या दुसऱ्या प्रती आणि नवीन प्रतिभूती देणे.**

११. (१) जर शासकीय प्रतिभूतीस हक्कदार असणारी व्यक्ती ती प्रतिभूती हरवली, चोरीस गेली किंवा नष्ट झाली, अथवा विरूपित किंवा विकृत झाली असे अभिकथन करून बँकेकडे तसा अर्ज करील तर, त्या प्रतिभूतीचे हरवणे, चोरी, नाश, विरुपण किंवा विकृती याबाबत रिझर्व्ह बँकेचे समाधान होईल असा पुरावा मिळाल्यानंतर, विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने व विहित करण्यात येईल अशी फी भरण्यात आल्यानंतर, बँक अर्जदाराला प्रदेय असणाऱ्या प्रतिभूतीची दुसरी प्रत देण्याचा आदेश देऊ शकेल.

(२) शासकीय प्रतिभूतीस हक्कदार असणारी व्यक्ती, त्या प्रतिभूतीचे दुसऱ्या प्रपत्रातील प्रतिभूतीमध्ये किंवा दुसऱ्या कर्जाच्या संबंधात निर्गमित केलेल्या प्रतिभूतीमध्ये रूपांतर करून मिळण्यासाठी अथवा तशा सारख्याच दुसऱ्या प्रतिभूतींशी तिचे एकत्रीकरण करून मिळण्यासाठी अथवा तिची पोट विभागणी अथवा नवीकरण करून मिळण्यासाठी बँकेकडे अर्ज करील तर, बँक विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने आणि विहित करण्यात येईल अशी फी भरण्यात आल्यानंतर, ती प्रतिभूती रद्द करू शकेल. आणि एक किंवा अनेक नवीन प्रतिभूती देण्याचा आदेश देऊ शकेल.

(३) या कलमान्वये जिला प्रतिभूतीची दुसरी प्रत किंवा नवीन प्रतिभूती देण्यात आलेली आहे ती व्यक्ती, कलम १९ च्या प्रयोजनार्थ, प्रतिभूतीची धारक म्हणून बँकेने मान्यता दिलेली व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल; आणि कोणत्याही व्यक्तीला अशा रीतीने देण्यात आलेली प्रतिभूतीची दुसरी प्रत किंवा नवीन प्रतिभूती ही [1][शासन] आणि अशी व्यक्ती व त्यानंतर तिच्यामार्फत हक्क प्राप्त करणाऱ्या सर्व व्यक्ती यांच्यामधील नवीन संविदा घटित करीत असल्याचे मानण्यात येईल.

**विवादग्रस्त प्रकरणी शासकीय प्रतिभूतीवरील हक्काबाबत बँकेकडून संक्षिप्त निर्णय होणे.**

१२. (१) एखाद्या शासकीय प्रतिभूतीवरील हक्काबाबत काही संशय आहे असे बँकेचे मत असेल तर, बँकेच्या प्रयोजनांसाठी कोणत्या व्यक्तीस त्या प्रतिभूतीस हक्कदार असलेली व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल त्याचा निर्णय घेण्यासाठी कार्यवाही सुरू करता येईल.

(२) बँक, तिला माहित असेल अशा दावा सांगणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला लेखी नोटीस देईल व त्या नोटीशीमध्ये, दावा सांगणाऱ्या इतर सर्व व्यक्तींची नावे आणि कोणत्या वेळी व बँकेचा कोणता अधिकारी रिझर्व्ह बँकेच्यावतीने निर्णय घेईल ते नमूद करण्यात येईल.

---

१. १९४९ चा अधिनियम ६ याच्या कलम ६ द्वारे, "केंद्र शासन" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला. (१ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून.)

(३) बँक दावा सांगणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला, अशा रीतीने घेतलेल्या निर्णयाच्या फलिताबाबतची लेखी नोटीस देईल.

(४) पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेल्या नोटिसा काढल्यापासून सहा महिन्यांचा अवधी समाप्त झाल्यानंतर, बँक, जी व्यक्ती त्या प्रतिभूतीस हक्कदार असल्याचे बँकेला आढळून आले असेल, त्या व्यक्तीकडे ती प्रतिभूती व त्यावरील कोणतेही अप्रदत्त व्याज निहित करण्याबाबतचा आदेश देऊ शकेल.

शासकीय प्रतिभूतींच्या संबंधात लागू असलेला कायदा.

१३. [1][शासनाने], सोयीचे व्हावे म्हणून शासकीय प्रतिभूतीचे प्रदान [2][भारतातील] एखाद्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्यत्र करण्याची व्यवस्था केलेली असली तरी, शासकीय प्रतिभूतींच्या संबंधातील सर्व व्यक्तींचे अधिकार हे [3][भारतातील] कायद्याद्वारे आणि तेथील न्यायालयांमध्ये या अधिनियमाद्वारे ज्यांच्यासंबंधी कार्यवाही केली जाते अशा सर्व प्रश्नांच्या संबंधात निर्णित करण्यात येतील.

पुरावा अभिलिखित करणे.

१४. (१) या अधिनियमान्वये जो आदेश देण्याची शक्ती बँकेला प्रदान करण्यात आलेली असेल असा कोणताही आदेश देण्याच्या प्रयोजनार्थ बँक, तिला जिचा पुरावा पाहिजे असेल ती कोणतीही व्यक्ती सादर करील असा कोणताही पुरावा पूर्णपणे किंवा त्याचा कोणताही भाग अभिलिखित करण्याची किंवा अभिलिखित करवून घेण्याची विनंती एखाद्या जिल्हा दंडाधिकाऱ्याला [4]* * करू शकेल. ज्याला अशी विनंती करण्यात आलेली आहे तो जिल्हा दंडाधिकारी स्वत: पुरावा अभिलिखित करू शकेल किंवा त्याला दुय्यम असणाऱ्या कोणत्याही प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याला किंवा राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे या संबंधात शक्ती प्रदान केलेल्या आणि त्याला दुय्यम असणाऱ्या कोणत्याही द्वितीय वर्ग दंडाधिकाऱ्याला पुरावा अभिलिखित करण्याचा निदेश देऊ शकेल, आणि तो त्याची एक प्रत बँकेकडे पाठवील.

(२) या अधिनियमान्वये निहित करण्याबाबतचा आदेश देण्याच्या प्रयोजनार्थ, बँकेला जिचा पुरावा पाहिजे असेल अशा कोणत्याही व्यक्तीचा पुरावा अभिलिखित करण्याचा निदेश आपल्या अधिकाऱ्यांपैकी एका अधिकाऱ्याला देऊ शकेल किंवा तिला प्रतिज्ञालेखावर दिलेला पुरावा स्वीकारता येईल.

(३) या कलमाच्या अनुषंगाने कार्य करणारा एखादा दंडाधिकारी किंवा बँकेचा एखादा अधिकारी, त्याने तपासणी केलेल्या कोणत्याही साक्षीदाराला शपथ देऊ शकेल.

प्रदाने व हस्तांतरणांची नोंदणी निहित करण्याबाबतचा आदेश देण्यात येईपर्यंत पुढे ढकलणे.

१५. जेथे एखादी शासकीय प्रतिभूती कोणत्याही व्यक्तीकडे निहित करण्यासाठी या अधिनियमान्वये आदेश देण्याचे बँकेने योजले असेल तेथे, बँकेला, निहित करण्याबाबतचा आदेश देण्यात येईपर्यंत, त्या प्रतिभूतीवरील व्याजाचे किंवा तिच्या परिणत मूल्याचे प्रदान निलंबित करता येईल अथवा कलम ११ अन्वये कोणताही आदेश देणे किंवा त्या प्रतिभूतीच्या कोणत्याही हस्तांतरणाची नोंदणी करणे लांबणीवर टाकता येईल.

बँकेची बंधपत्रे करून देण्यास फर्मावण्याची शक्ती.

१६. (१) या अधिनियमान्वये जो आदेश देण्याची शक्ती बँकेला असेल तो कोणताही आदेश देण्यापूर्वी बँक, तो आदेश जिच्या नावाने द्यावयाचा असेल त्या व्यक्तीला एका किंवा अधिक जामिनांसह विहित करण्यात येईल अशा प्रपत्रात, बंधपत्र करून देण्यास किंवा त्या आदेशाच्या विषयवस्तूच्या मूल्याच्या दुपटीपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेची प्रतिभूती देण्यास फर्मावू शकेल; या बंधपत्राची किंवा प्रतिभूतीची रक्कम बँकेत किंवा पोटकलम (२) च्या पुर:सरणार्थ रिझर्व्ह बँक ते बंधपत्र किंवा प्रतिभूती जिला अभिहस्तांकित करील त्या कोणत्याही व्यक्तीला तिची रक्कम देण्यासाठी ते बंधपत्र किंवा प्रतिभूती रिझर्व्ह बँकेकडे सोपवून धारण करण्यात येईल.

(२) अशा कोणत्याही आदेशाच्या विषयवस्तूच्या संबंधातील, एखादा दावा ज्या न्यायालयासमोर सिद्ध करण्यात आला असेल ते न्यायालय, ते बंधपत्र किंवा प्रतिभूती यशस्वी दावाकाराकडे अभिहस्तांकित करण्याचा आदेश देऊ शकेल. त्यानंतर तो दावाकार अशा दाव्याच्या मर्यादेपर्यंत त्या बंधपत्राची किंवा प्रतिभूतीची बजावणी करण्यास हक्कदार होईल.

नोटिसा शासकीय राजपत्रात प्रकाशित करणे.

१७. बँकेने या अधिनियमान्वये देणे आवश्यक असलेल्या कोणत्याही नोटीशीची बजावणी डाकेने करता येईल. परंतु अशी प्रत्येक नोटीस ही, [5][ती नोटीस केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या प्रतिभूतीशी संबद्ध आहे की राज्य शासनाने निर्गमित केलेल्या प्रतिभूतीशी त्याप्रमाणे भारताच्या राजपत्रात किंवा राज्याच्या शासकीय

---

१. १९४९ चा अधिनियम ६ याच्या कलम ६ द्वारे "केंद्र शासनाने" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला. (१ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून.)

२. १९५६ चा अधिनियम ५७ याच्या कलम ८ द्वारे "भाग क राज्यांतील आणि भाग ख राज्यांतील", या मजकुराऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला. (१५ ऑक्टोबर, १९५६ रोजी व तेव्हापासून.)

३. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे "त्या राज्यांच्या" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला. (१५ ऑक्टोबर, १९५६ रोजी व तेव्हापासून.)

४. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे "किंवा भाग ख राज्यातील राजकीय प्रतिनिधीला" हा मजकूर वगळण्यात आला. (१५ ऑक्टोबर, १९५६ रोजी व तेव्हापासून).

५. १९४९ चा अधिनियम ६ याच्या कलम ७ द्वारे "शासकीय राजपत्रात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला. (१ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून.)

राजपत्रात] देखील प्रकाशित करण्यात येईल. आणि ती अशाप्रकारे प्रकाशित करण्यात आल्यानंतर ती ज्यांच्या ज्यांच्यासाठी उद्देशित असेल त्या सर्व व्यक्तींना पोचती झाली असल्याचे मानण्यात येईल.

निहित करण्याबाबतच्या आदेशाची व्याप्ती.

१८. बँकेने या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाद्वारे एखाद्या शासकीय प्रतिभूतीवर संपूर्ण हक्क प्रदान केला जाऊ शकेल किंवा संपूर्ण हक्क निहित करण्याबाबतचा पुढील आदेश येईपर्यंत केवळ त्या प्रतिभूतीवर उपार्जित झालेल्या व उपार्जित होणाऱ्या व्याजावर हक्क प्रदान केला जाऊ शकेल.

बँकेने दिलेल्या आदेशांचा वैध परिणाम.

१९. बँकेने एखाद्या व्यक्तीला एखाद्या शासकीय प्रतिभूतीचा धारक म्हणून दिलेली मान्यता किंवा बँकेने या अधिनियमान्वये दिलेला कोणताही आदेश, शासकीय प्रतिभूतीचा धारक म्हणून ज्या व्यक्तीला रिझर्व्ह बँकेने मान्यता दिलेली असेल त्या व्यक्तीबरोबर किंवा अशा प्रतिभूतीमध्ये हितसंबंध असल्याचा दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीबरोबर [1][शासनाचे] किंवा बँकेचे जे संबंध असतील त्या संबंधांवर अशा मान्यतेचा किंवा आदेशाचा जेथवर परिणाम होत असेल तेथवर, कोणत्याही न्यायालयास प्रश्नास्पद करता येणार नाही आणि रिझर्व्ह बँकेने कोणत्याही व्यक्तीला दिलेली अशी कोणतीही मान्यता किंवा एखादी शासकीय प्रतिभूती कोणत्याही व्यक्तीकडे निहित करण्याबाबत बँकेने दिलेला कोणताही आदेश, केवळ, त्या प्रतिभूतीच्या साधिकार मालकाच्या लेख्यावर असलेल्या व प्राप्त झालेल्या पैशाबद्दल त्याच्या वैयक्तिक दायित्वाच्या अधीनतेने, त्या व्यक्तीला त्या प्रतिभूतीवरील हक्क प्रदान करण्यासाठी प्रवर्तित होईल.

न्यायालयाच्या आदेशावरून कार्यवाहीस स्थगिती.

२०. या अधिनियमान्वये जो आदेश देण्याची शक्ती बँकेला आहे असा कोणताही आदेश, कोणत्याही शासकीय प्रतिभूतीच्या संदर्भात देण्याचे बँक योजील, आणि तो आदेश देण्यापूर्वी असा आदेश देण्यास स्थगिती देणारा [2][भारतातील] एखाद्या न्यायालयाने दिलेला बँकेला मिळेल त्या बाबतीत, रिझर्व्ह बँक एकतर,—

(क) त्या न्यायालयाकडून पुढील आदेश मिळेपर्यंत ती प्रतिभूती तिच्यावरील अप्रदत्त किंवा उपार्जित होणाऱ्या कोणत्याही व्याजासह धारण करील, किंवा

(ख) त्या न्यायालयापुढील कार्यवाही निकालात निघेपर्यंत असे न्यायालय ज्या राज्यात असेल त्या राज्यासाठी नियुक्त केलेल्या शासकीय न्यासीकडे ती प्रतिभूती हस्तांतरित करण्यात यावी यासाठी त्या न्यायालयाकडे अर्ज करील.

निहित करण्याबाबतची कार्यवाही बँकेकडून रद्द केली जाणे.

२१. जेथे या अधिनियमान्वये एखादी शासकीय प्रतिभूती कोणत्याही व्यक्तीकडे निहित करण्याबाबतचा आदेश देण्याचे बँक योजील तेथे असा आदेश देण्यापूर्वी कोणत्याही वेळी बँकेला त्या प्रयोजनार्थ अगोदर सुरू केलेली कोणतीही कार्यवाही रद्द करता येईल आणि कार्यवाही अशा रीतीने रद्द केल्यानंतर, असा आदेश देण्याचे काम तिला नव्याने सुरू करता येईल.

शासकीय प्रतिभूतींवरील व्याजाच्या संबंधातील विमुक्ती.

२२. एखाद्या शासकीय प्रतिभूतीच्या अटींमध्ये व्यक्तपणे अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीज करून, अशा प्रतिभूतीवर देय असलेल्या रकमेच्या प्रदानासाठी सर्वांत आधीच्या ज्या दिनांकास मागणी करायला हवी असेल त्या दिनांकानंतर उलटून गेला असेल त्या कोणत्याही कालावधीच्या संबंधात, अशा प्रतिभूतीवरील व्याजावर दावा सांगण्यास कोणतीही व्यक्ती हक्कदार असणार नाही.

दर्शनी बंधपत्रांच्या संबंधातील विमुक्ती.

२३. एखादे दर्शनी बंधपत्र किंवा अशा एखाद्या बंधपत्राचे कोणतेही व्याज कुपन देय होईल त्या दिनांकास किंवा त्यानंतर ते असे बंधपत्र किंवा कुपन सादर करण्यात आल्यावर त्याच्या धारकाला त्यामध्ये दर्शविलेल्या रकमेचे प्रदान केल्यानंतर [3][शासन] त्या बंधपत्राच्या किंवा कुपनच्या संबंधातील सर्व दायित्वापासून होईल मात्र, अशा प्रदानापूर्वी, असे प्रदान करण्यास [4][शासनास] विरोध करणारा [5][भारतातील] एखाद्या न्यायालयाचा आदेश [4][शासनावर] बजावण्यात आलेला असेल तर अलाहिदा.

---

१. १९४९ चा अधिनियम ६ याच्या कलम ६ द्वारे "केंद्र शासनाचे" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला. (१ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून.)

२. १९५६ चा अधिनियम ५७ याच्या कलम १० द्वारे "भाग क राज्यातील किंवा भाग ग राज्यातील" या मजकुराऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला. (१५ ऑक्टोबर, १९५६ रोजी व तेव्हापासून).

३. १९४९ चा अधिनियम ६ याच्या कलम ६ द्वारे "केंद्र शासन" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला. (१ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून).

४. १९४९ चा अधिनियम ६ याच्या कलम ६ द्वारे "केंद्र शासनावर" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला. (१ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून.)

५. १९५६ चा अधिनियम ५७ याच्या कलम ११ द्वारे "राज्यातील" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला. (१५ ऑक्टोबर, १९५६ रोजी व तेव्हापासून.)

**शासनाच्या व्याजाच्या संबंधातील दायित्वाची मुदतमर्यादा.**

२४. जेथे त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे कोणतीही कमी मुदतमर्यादा नियत केली नसेल तेथे, एखाद्या शासकीय प्रतिभूतीवर देय असलेल्या कोणत्याही व्याजाच्या प्रदानासंबंधीचे [1][शासनाचे] दायित्व हे, व्याज म्हणून देय रक्कम ज्या दिनांकास प्रदेय होईल त्या दिनांकापासून सहा वर्षे उलटून गेल्यानंतर समाप्त होईल.

**दस्तऐवजांचे निरीक्षण.**

२५. विहित करण्यात येईल अशा परिस्थितीत व रीतीने व अशा शर्तींच्या अधीनतेने असेल ते खेरीज करून, [2][शासनाच्या] कब्जात किंवा अभिरक्षेत असलेल्या कोणत्याही शासकीय प्रतिभूतीचे निरीक्षण करण्यास किंवा त्या प्रतिभूतीमधून अथवा शासकीय प्रतिभूतींच्या किंवा कोणत्याही शासकीय प्रतिभूतीच्या संबंधात, [3][शासनाकडून] किंवा त्यांच्यावतीने ठेवण्यात किंवा राखण्यात आलेले कोणतेही पुस्तक, नोंदवही किंवा इतर दस्तऐवज यामधून प्राप्त केलेली कोणतीही माहिती स्वीकारण्यास कोणतीही व्यक्ती हक्कदार असणार नाही.

**बँक आणि तिचे अधिकारी हे लोक अधिकारी असल्याचे मानणे.**

२६. भारतीय साक्षी पुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १), याचे कलम १२४, लोक अधिकाऱ्यांकडून त्यांच्या पदीय नात्याने किंवा त्यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या दाव्यांच्या संबंधात दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) च्या भाग चार चे उपबंध, आणि उक्त संहितेचा आदेश पाच, यातील नियम २७ आणि आदेश एकवीस यातील, नियम ५२ याचे उपबंध यांच्या प्रयोजनार्थ बँक आणि बँकेचा अधिकारी या नात्याने काम करणारा त्या बँकेचा कोणताही अधिकारी हे लोक अधिकारी असल्याचे मानण्यात येईल.

**शास्ती.**

२७. (१) जर स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी एखाद्या शासकीय प्रतिभूतीवर कोणताही हक्क मिळवण्याच्या प्रयोजनासाठी कोणतीही व्यक्ती, खोटे असलेले आणि जे एकतर खोटे आहे हे त्याला माहीत असेल किंवा जे खरे आहे असे त्याला वाटत नसेल असे कोणतेही विधान, अधिनियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही अर्जामध्ये किंवा या अधिनियमाच्या अनुषंगाने सुरू केलेल्या कोणत्याही चौकशीच्या ओघात, या अधिनियमाखालील कोणत्याही प्राधिकाऱ्यांकडे करील तर, तिला सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

(२) बँकेच्या तक्रारीवर असेल त्याव्यतिरिक्त कोणतेही न्यायालय, पोटकलम (१) अन्वये कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

**नियम करण्याची शक्ती.**

२८. (१) केंद्र शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील ; मात्र हे नियम शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अगोदर प्रकाशित करण्याच्या शर्तींच्या अधीन असतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शर्तींच्या सर्वसाधारणतेला हानी न पोचवता, अशा नियमांमध्ये पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येईल. त्या बाबी अशा :—

(क) शासकीय प्रतिभूती ज्या प्रपत्रात निर्गमित करता येतील ती प्रपत्रे ;

(ख) कलम २ च्या पोटकलम (२) याच्या उपखंड (क्) च्या खंड (चार) मध्ये निर्देशिलेल्या आबंधनाचे प्रपत्र ;

(ग) [4][भूतपूर्व भारतीय संस्थानांच्या अधिपतींना] ज्या शर्तींच्या अधीनतेने शासकीय प्रतिभूती दिल्या जाऊ शकतील त्या शर्ती ;

(घ) निरनिराळ्या प्रपत्रांतील शासकीय प्रतिभूती ज्या रीतीने हस्तांतरित करता येतील ती रीत ;

(ङ) सार्वजनिक पदांव्यतिरिक्त अन्य पदांच्या धारकांनी शासकीय प्रतिभूती रोख्यांच्या स्वरुपात धारण करणे आणि अशा रीतीने धारण केलेल्या प्रतिभूती ज्या रीतीने व ज्या शर्तींच्या अधीनतेने हस्तांतरित करता येतील ती रीत व त्या शर्ती ;

(च) ज्या रीतीने शासकीय प्रतिभूतींच्या संबंधातील व्याज द्यावयाचे व त्याची पोच द्यावयाची ती रीत ;

(छ) शासकीय प्रतिभूतींच्या दुसऱ्या प्रती, नवीकरण केलेल्या, रूपांतरण केलेल्या, एकत्रीकरण आणि पोट-विभागणी केलेल्या शासकीय प्रतिभूती देण्याचे नियमन करणाऱ्या शर्ती ;

(ज) शासकीय प्रतिभूतींच्या दुसऱ्या प्रती देण्याच्या संबंधात व शासकीय प्रतिभूतींचे नवीकरण रूपांतरण, एकत्रीकरण आणि पोट-विभागणी करण्याच्या संबंधात भरावयाची फी ;

(झ) विमुक्ती, नवीकरण, रूपांतरण, एकत्रीकरण किंवा पोट विभागणी यासाठी पोचती केलेली शासकीय प्रतिभूती मिळाल्याची पावती ज्या प्रपत्रात द्यावयाची ते प्रपत्र ;

---

१. १९४९ चा अधिनियम ६ याच्या कलम ६ द्वारे "केंद्र शासनाचे" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला. (१ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे "केंद्र शासनाच्या" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला. (१ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे "केंद्र शासनाकडून" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला. (१ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून).

४. १९५६ चा अधिनियम ५७ याच्या कलम १२ द्वारे, "भाग ख राज्यांचे शासक" या मजकुराऐवजी मजकूर हा दाखल करण्यात आला. (१५ ऑक्टोबर, १९५६ रोजी व तेव्हापासून.)

(ञ) रोख्याच्या स्वरूपात धारण केलेल्या शासकीय प्रतिभूतींशी संबंधित दस्तऐवजांचे साक्षांकन करण्याची रीत;

(ट) जी एखादी व्यक्ती कोणत्याही कारणामुळे लिहिण्यास असमर्थ असेल त्या व्यक्तीच्या मागणीवरून [1][शासनाने] काढलेल्या कोणत्याही शासकीय प्रतिभूतीशी किंवा कोणत्याही पृष्ठांकनाशी किंवा एखाद्या वचनचिठ्ठीशी संबंधित कोणताही दस्तऐवज, त्या व्यक्तीच्या वतीने ज्या रीतीने निष्पादित करता येईल ती रीत;

(ठ) कलम १६ च्या पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या बंधपत्रांचे प्रपत्र;

(ड) ज्या परिस्थितीत आणि ज्या रीतीने व ज्या शर्तींच्या अधीनतेने कलम २५ अन्वये शासकीय प्रतिभूती, पुस्तके, नोंदवह्या आणि अन्य दस्तऐवज यांचे निरीक्षण करण्याची मुभा देता येईल किंवा त्यांमधील माहिती देता येईल, ती परिस्थिती, ती रीत व त्या शर्ती;

(ढ) निहित करण्याबाबत आदेश देताना अनुसरावयाची कार्यपद्धती;

(ण) कलम ७ च्या परंतुकामध्ये निर्देशिलेले प्रमाणपत्र ज्या प्राधिकाऱ्याने द्यावयाचे तो प्राधिकारी आणि त्यामध्ये उल्लेखिलेली चौकशी करण्याची रीत;

[2][(त) कलम ९ ख अन्वये ज्या प्रपत्रात व ज्या व्यक्तींच्या नावाने नामनिर्देशने करता येतील ते प्रपत्र व त्या व्यक्ती, अशी नामनिर्देशने ज्या रीतीने व ज्या शर्तींच्या व निर्बंधांच्या अधीनतेने करता येतील ती रीत, त्या शर्ती व ते निर्बंध अशा नामनिर्देशनांची नोंदणी, त्यात बदल करणे किंवा ती रद्द करणे आणि अशी नोंदणी; बदल किंवा रद्द करण्यासाठी आकारता येईल अशी फी;

(थ) कलम ९ख याच्या पोटकलम (४) च्या प्रयोजनार्थ, कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती ज्या रीतीने करता येईल ती रीत.]

[3][(३) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने किंवा दोन अथवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि जर पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि, अशा आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.]

**विवक्षित कायदे शासकीय प्रतिभूतींना लागू न होणे.**

[4][२९. भारतीय प्रतिभूती अधिनियम, १९२० (१९२० चा १०) आणि त्या कायद्याशी समनुरूप असा, लोक ऋण (विशोधन) अधिनियम, १९५६ (१९५६ चा ५७) याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कोणत्याही 'भाग ख' राज्यामध्ये अंमलात असलेला कोणताही कायदा, हा अधिनियम लागू असलेल्या शासकीय प्रतिभूतींना आणि या अधिनियमाद्वारे ज्यांच्यासाठी उपबंध करण्यात आलेला आहे अशा सर्व बाबींना लागू होण्याचे बंद होईल:

परंतु, हैदराबाद-सौराष्ट्र किंवा त्रावणकोर-कोचीन शासनाने, ३१ मार्च १९५३ रोजी किंवा त्यापूर्वी निर्माण केलेल्या आणि निर्गमित केलेल्या कोणत्याही प्रतिभूतींना किंवा त्यांच्या संबंधात, केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे, लोक ऋण (विशोधन) अधिनियम, १९५६ (१९५६ चा ५७) याच्या प्रारंभापासून एक वर्षापेक्षा अधिक नसेल, इतक्या कालावधीसाठी असा समनुरूप कायदा लागू असण्याचे चालू राहील.]

---

१. १९४९ चा अधिनियम ६ याच्या कलम ६ द्वारे "केंद्र शासनाने" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला (१ एप्रिल, १९४९ रोजी व तेव्हापासून).

२. १९५९ चा अधिनियम ४४ याच्या कलम ३ द्वारे उप खंड (त) व (थ) समाविष्ट करण्यात आले (१ ऑगस्ट, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. १९७२ चा अधिनियम ४४ याच्या कलम ४ द्वारे जुने पोटकलम (३) याच्याऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले (१ सप्टेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).

४. १९५६ चा अधिनियम ५७ कलम १२ द्वारे मूळ कलम २९ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले (१५ ऑक्टोबर, १९५६ रोजी व तेव्हापासून).

दिनांक १ एप्रिल १९५१ पूर्वी 'भाग ख' राज्यांमध्ये अंमलात नसतील अशा कायद्यांच्या संदर्भाचा अर्थ लावणे.

[1][३०. 'भाग ख' राज्ये (कायदे) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ३) याच्या प्रारंभापूर्वी कोणत्याही 'भाग ख' राज्यावर किंवा अशा राज्याच्या कोणत्याही भागावर ज्याचा विस्तार नव्हता अशा कोणत्याही कायद्याच्या या अधिनियमामधील कोणत्याही संदर्भाचा अर्थ, आवश्यक असेल तेथे तेथे त्यात उक्त दिनांकापूर्वी त्या राज्यामध्ये किंवा, प्रकरणपरत्वे, त्याच्या कोणत्याही भागामध्ये कोणताही समनुरूप कायदा अंमलात असल्यास त्या समनुरूप कायद्याचा संदर्भ समाविष्ट आहे, असा लावण्यात येईल.]

जम्मू व काश्मीरमध्ये अंमलात नसतील अशा कायद्यांच्या संदर्भाचा अर्थ लावणे.

[2][३१. जम्मू व काश्मीर राज्यामध्ये अंमलात नसेल अशा एखाद्या कायद्याच्या या अधिनियमामधील कोणत्याही संदर्भाचा अर्थ, आवश्यक असेल तेथे, त्या राज्यामध्ये कोणताही समनुरूप कायदा अंमलात असल्यास त्या समनुरूप कायद्याचा संदर्भ त्यात समाविष्ट आहे असा लावण्यात येईल.]

---

१. १९५६ चा अधिनियम ५७, याच्या कलम १४ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले (१५ ऑक्टोबर, १९५६ रोजी व तेव्हापासून).

२. १९७२ चा अधिनियम ४४, याच्या कलम ४ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले (१ सप्टेंबर, १९७२ रोजी व तेव्हापासून).